Indian Streams Research Journal
ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# आई : एक साठवण

डॉ. गायत्री सोपान गाडेकर
मराठी विभाग , स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई.

**प्रस्तावना**

जगातील सर्व भाषांमधील कलाकृतीमध्ये आईविषयक अनेक कलाकृती निर्माण झाल्या. मराठी साहित्याच्या प्रांगणात प्राचीन काळापासून ते आतापर्यंत अनेक काव्य 'आई' विषयी निर्माण झाले तरी त्यातील अवीट गोडी संपली नाही व संपणारही नाही. कारण आई म्हणजे ईश्वराचेच एक रूप. ईश्वराचे जगातील भक्तांवर प्राणीमात्रांवर प्रेम असल्याने व त्यांना सुखसमाधान लाभावे म्हणून आईच्या रुपाने तो अवतीर्ण झाला आहे आणि ह्याच संतांनी भक्तांनी ईश्वरालाच आईच्या ठिकाणी बसविले आहे. आपल्या देवाला आईच्या रुपात पाहणे आणि आईमध्ये देव पाहणे हा उच्च दर्जाचा मानवतावाद, अद्वैताचा प्रत्यय भारतीय संस्कृतीत पहावयास मिळतो. जगतगुरु शंकराचार्य यांनी तैत्तरीय उपनिषदात आईला 'मातृदेवोभवं' असे म्हटले आहे. अशा या एकरुपत्वाचे दर्शन त्याचा आनंद हे सर्व काही अनिर्वचनीय ह्या एकरुपत्वाचा प्रत्यय येतांना तुकारामांच्या अभंगाची आठवण येते.

"लवण मेळविता जले
काय उरले निराळे
तैसा समरस जालो
तुजमाजी हरपलो"




असे हे अद्वेत अटळ , अढळप्रेम हे साहित्यिकांनी रंगवितांना अनेक प्रतिमांचा वापर करुन आईचे महात्म्य आपणासमोर आणले.

आई म्हणजे मायेचा स्तूप, आई म्हणजे अमृताचा अखंड झरा, आई म्हणजे त्यागाची, कारुण्याची प्रेमाची मूर्ती, आई म्हणजे आभाळमाया, आई म्हणजे गंगोत्री, आई म्हणजे प्रेमाचा सागर, आई म्हणजे चांदण्याची शीतलता, रम्यता, आई म्हणजे मांगल्य, आई म्हणजे पावित्र्य, आई म्हणजे पृथ्वीचे औदार्य सागराचे गांभीर्य, अमृताचा कुंभ, साक्षात शब्दब्रम्ह, जगातील सर्वात सुंदर शब्द म्हणजे आई. जगातील सर्वात सुंदर हाक म्हणजे आई, कितीही विशेषणे लावली तरी आईची महती तिचा गौरव हा अनिर्वचनीयच.

अशा या प्रेमाला साने गुरुजींनी दिव्य संजीवनी म्हटले आहे. या दिव्य संजीवनी मुळेच ज्यांचे व्यक्तिमत्व घडले ते रामदास, तुकाराम, नामदेव, कबीर, याज्ञवल्क्य, शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, विनोबा भावे, गांधीजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, शंकराचार्य असे कितीतरी नावे सांगता येतील. या आईच्या प्रेमाने, संस्काराने जागतिक किर्ती त्यांना मिळवून दिली. ते अजरामर झाले. अशी ही आई प्रत्येकाच्या मनात ज्याप्रमाणे वसलेली आहे त्याचप्रमाणे ती साहित्यातही वसलेली आहे. साहित्याची बाग तिने बहरुन टाकली आहे. या अनुषंगाने वेदकाळापासुन आतापर्यंत तिचे अस्तित्व आपल्याला कसं कसे जाणवत गेले ? कसे तिने आपल्याला संस्कारित केले ? कशी माया तिने केली तो आपण तिच्या वैविध्य रूपात पाहू.

वेदवाङ्मयात पृथ्वीची स्तुती आळविली आहे. अर्थववेदातील ऋचांमध्ये पृथ्वीला माता असे संबोधले आहे ती समृध्दी व संपत्ती देणारी असल्याने धान्यरूपी, भूमाता, महीमाता, पद्मा, लक्ष्मी, श्री असेही म्हटल्या जाते. भारतीय संस्कृतीत घरातील स्त्री ही सकाळी उठल्याबरोबर भूमातेचे स्मरण करते. नमस्कार करतांना क्षमा मागते व म्हणते, 'विष्णुपत्नि नमस्तुम्यं पादस्पर्श क्षमस्वमे' अशी कृतज्ञता व्यक्त करते व प्रार्थना करतांना ती म्हणते, तू सर्वांच्या निवाऱ्याचे एकमेव स्थान आहेस. तुझा कंप भयप्रद आहे, तू आम्हाला सुवर्णाप्रमाणे तेजस्वी कर"

ऋगवेदातील सुक्तात सरस्वतीला मातेचे स्थान दिले आहे. नद्यांमध्ये व मातांमध्ये सरस्वती श्रेष्ठ असल्याचे पुरावे मिळतात या सरस्वतीची आई म्हणजे दुर्गा हिचा अथर्ववेदात तेजाला तेजस्वी करणारी असा तिचा गुणगौरव केला आहे.

वेदांमध्ये आई हा शब्द जगन्माता लोकमाता, आदिमाता म्हणून आलेला आहे. जगन्माता रमेची प्रार्थन करुन तिच्या कृपाप्रसादाची इच्छा व्यक्त केली जाते.

मातेने आपले रक्षण करावे ह्या हेतूने जगन्माता रमा ची भक्ती केल्या जाते आळवणी केल्या जाते. हे सुंदर जग ज्या मातेने दाखविले त्या मातेचा गौरव व्यक्त करण्यासाठी, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मातेच्या ऋणातून काकणभर का होईना

उतराई होण्यासाठी देवतांची नावे ठेवली जातात त्याचबरोबर मातेच्या नावावरुन मुलांची नावे प्रत्ययास येतात. उदा. कौतेय, गार्गेय, गांगेय, अंजनीसुत इ.

संत साहित्यात ईश्वराला मातृस्वरुपात व्यक्त केल्या गेलेली उदाहरणे मोठ्या प्रमाणात पहावयास मिळतात. सर्व संताची आई म्हणजे विठ्ठल ह्या विठाईच्या भेटीसाठी जनाबाई व्याकूळ होतात व म्हणतात,

" ये गं ये गं विठाबाई माझे पंढरीचे आई
आता जीव जाऊ पाहे | धाव घाली माझे आये
माझी भेटवा जननी | संता विनवी दासीजनी "

अशी, विठूमाऊलीला आई म्हणून हाक देतात, त्यातील आर्तता, भावोत्कटता रमणीय आहे. जनाबाई प्रमाणेच कान्होपात्रा विठ्ठलाला बोलावते आहे.

" तुजविणा ठाव न दिसे त्रिभुवनी
धावे वो जननी विठाबाई
मोकलोनी आस जाहले मी उदास
घेई कान्होपात्रेस हृदयात
तर सावता माळी म्हणतात 'कांदा मुळा भाजी
अवघी विठाई माझी"

अशाप्रकारे विठ्ठलामध्ये आईचे रुप पाहतांना संतांच्या अभंगामध्ये एकरुपत्वाचा कळस प्रेमाचा कळस सुंदर रितीने संतांनी साकारलेला आहे.

पूर्वीच्या काळी ज्ञानार्जनासाठी गुरुकुलात जाण्याची प्रथा होती. तेव्हां गुरुच्या घरी ज्ञानदात्री नवीन माऊली जोडल्या गेली ती म्हणजे गुरुमाऊली. अशा या गुरुशिवाय गती नाही. ज्ञान नाही. गुरु हे परब्रम्हाचे रूप तेव्हां वारकरी पंथात ज्ञानदेवांची भक्तगणांनी 'गुरुमाऊली' म्हणून आळवणी केली. आपल्या बाळाचे चांगल्या माणसात रुपांतर करण्याची किमया ज्याप्रमाणे आई करते तशाच प्रकारे व्यापक पातळीवर दुर्जनांचे सज्जनांमध्ये रुपांतर करणारे ज्ञानेश्वर आहेत म्हणून त्यांना 'माऊली' म्हटल्या गेले. संत जनाबाई आपल्या अभंगात म्हणतात,

"अहो सखीये साजणी | ज्ञानाबाई हो हरणी
मज पाडसाची माय | भक्तिवत्साची ते गाय
का गा उशीर लाविला | तुजविण शीण जाला
अहो बैसले दळणी | धाव घाली म्हणे जनी"

तसेच संत बहिणाबाईंनी सुध्दा तुकारामांची 'माऊली' म्हणून आळवणी केली आहे.

रामायण, महाभारतात थोर मातांची उदाहरणे पहावयास मिळतात. कौसल्या ही प्रसिध्दीपराङ्मुख, निष्कामकर्मयोगिनी, सेवाभाव त्यागी वृत्तीची अशी आहे. कैकयी पुत्रप्रेमापोटी आंधळी झालेली, पुत्रप्रेमासाठी पतीच्या प्राण्याची पर्वा न करणारी तर सुमित्रा पुत्रप्रेमाबरोबर सगळया जगावर प्रेम करणारी थोर विवेकी त्यागी अशी वाल्मिकींनी रंगविली आहे.

### पुत्राला नदीत टाकून दिल्यानंतर सैरभैर झालेली आई :

पुत्रप्रेमासाठी व्याकुळ झालेली स्त्री म्हणजे राजमाता कुंती पुत्राला नदीत टाकून दिल्यानंतर तिचे काळीज हे सैरभैर झाले होते ती गंगेची प्रार्थना करुन म्हणते

"गंगे, गोदे, यमुने, माझा नव्हे
तुझचि हा बाळ
जतन करी गे प्रेमे स्वाधीन केला न
कापिता नाळ"

असे आर्जव ती करतांना दिसते.

### नदीकडे पुत्राची मागणी करणारी आई :

माता सत्यवती गंगा आईला पुत्राची मागणी करते. तिच्यातील भक्तीभाव मनाची अवस्था आर्तनेने आपल्यासमोर व्यक्त झाली आहे. ती म्हणते-

" दे बाळ मला, माझ्रा गंगामाई
बघ व्याकुळ झाली ही आई
प्रासादरिता रात्रंदिन मज खाई
मज चैन नसे गं बाई
मज राज्य नको, नको वैभव सारी
परी पुत्र येऊ दे दारी |"

पुत्रासाठी आसुसलेली सत्यवती अशी करुणा भाकते. सीता, देवकी, यशोदा, द्रोपदी, विदुला, सुभद्रा, शकुंतला, अंजनी, देवदूती ह्या आदर्शमाता होत्या. या अक्षय महाकाव्यातील आईसारखे लोकसाहित्यात देखील आईचे वर्णन विपुल प्रमाणात आलेले आहे.

### आई बद्दलचे प्रेम :

दैनंदिन कामे करतांना आईविषयी प्रेम आत्मीयता वेळोवेळी व्यक्त झाली आहे. आईसारखे निस्सीम व निस्वार्थी प्रेम कोणीच करु शकत नाही हे सांगतांना निसर्गाच्या रूपाने आईबद्दल प्रेम व्यक्त करतांना लोकगीतातील स्त्री म्हणते.

"आई वाचून माया | कोणाला फुटेना
पावसावाचून रान | हिरवं दिसना "

अशी प्रतिमा उत्कटतेने वापरुन आपल्या मनातील भाव अभिव्यक्त केला आहे.

### आईबद्दल कृतज्ञता :

आईने आपल्याला वाढविण्यासाठी अनेक तऱ्हेचे कष्ट घेतले आहे. त्या उपकराची जाणीव तिला असल्याने ती म्हणते,

" माईचा उपकार | काय फेडीशी येड्याजीवा
मांडीचा चवरंग | नेतराचा केला दिवा
नऊ महिने ग वज्ज | वागविलं माझ कुशी
माय माझ्या हरणीला | फिरुन बोलू कशी "

### प्रतिकात्मकतेतून व्यक्त होणारी सावत्र आई :

अशी ही आई हिच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. असा या प्रेमळ मुलांसाठी खस्ता खाणाऱ्या आईच्या मृत्युनंतर वडील दुरावतात तेव्हां लेकरांचे निवाऱ्याचे स्थान संपुष्टात येते. सावत्र आई मुलांच्या वाट्याला येते व ती सावत्र आई कशी असते हे वेदनादायी वास्तव लोकसाहित्यातील ओवीगीतातून अभिव्यक्त झाले आहे. स्त्री म्हणते

सावत्र आईची | प्रीतीही विषारी
काटे बोचतील | जरी बाभूळ मिठी भारी

लोकगीतातील सावत्र आईचे चित्र हे उत्कृष्ट चित्रकाराप्रमाणे वास्तव प्रतिमासह रेखाटल्या गेले आहे.

भारतात इंग्रजांचे आगमन झाले त्यांनी मुद्रणकला आणली. शैक्षणिक प्रगती भारतातील लोकांची होण्याला सुरुवात झाली. आंग्ल शिक्षितांची एक पिढी तयार होऊन ती आपल्या भावना व्यक्त करु लागली. विचार बैठक तयार होवून भरपूर प्रमाणात लेखन होवू लागले.

त्यात काव्याच्या प्रांगणात अनेक कवींनी लेखन करुन आईची प्रतिमा जपली. त्यामध्ये महादेव मोरेश्वर कुंटे, गंगाधर रामचंद्र मोगरे, विठ्ठल भगवंत लेभे, विष्णु गणेश नेने, हरिकृष्ण दामले, मोरो गणेश लोंढे, शिवराम रामकृष्ण नित्सुरे इ. नी काव्यरचना केल्या.

**मातृवियोगाच्या दुःखाने व्याकूळ झाल्याने होणारी मनाची अवस्था :**

केशवसुतांच्या काव्यलेखनांची प्रेरणा घेवून रविकिरण मंडळातील कवींनी मोठ्या प्रमाणात काव्यलेखन केले त्यापैकी एक यशवंत दिनकर पेंढारकर १९२१ मध्ये आई कविता लिहून मराठी काव्यसृष्टीत एक इतिहास घडविला. या कवितेने यशवंताना लोकप्रिय केले ह्या कवितेत संपूर्ण प्रतिभा पूर्णपणे एकवटून अवतरल्याचे प्रत्ययास येते. एवढी ती तरल भावस्पर्शी झाली आहे. त्यांच्या या कवितेत मातृवियोगाचे दुःख व्यक्त करतांना कवी म्हणतात.

'तुझ्याविना न कोणी | लावील साजवाती
सांगेल ना म्हणाया आम्हा शुभंकरोति
आई म्हणोनि कोणी आईस हाक मारी
ती हाक येई कानी मज होय शोकभारी
नोहेच हाक, माते मारी कोणी कुठारी
आई कुणा म्हणू मी ? आई घरी न दारी
स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी
------- रुसणार मी न आता जरी बोलशील रागे
ये रागवावयाही परि येई येई वेगे"

आई तू रागवण्यासाठी का होईना पण ये, या पंक्तीतून आईच्या विरहाने सदगदीत झालेल्या कवीला, आईची आस लागली आहे. म्हणून तो आईला स्वर्गातून बोलावतो आहे. आर्तता, उत्कंठा आईच्या प्रेमाने व्याकूळ झालेल्या कवी मनातील दुःख, भावना वास्तवासह रेखाटल्या गेल्या आहे.

रविकिरण मंडळाचे दुसरे सदस्य माधव ज्युलियन यांनी ही आईच्या मृत्युनंतर मनाचीझालेली अवस्था कवितेतून शब्दबध्द केली आहे. आईच्या प्रेमाने व्याकूळ होवून कवी धावा करीत आहे आणि म्हणतात,

"प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई
बोलावू तुज आता मी कोणत्या उपायी
वाटे इथून जावे | तुझ्यापुढे निजावे
नेत्री तुझ्या हसावे, चित्ती तुझ्या ठसावे

ही व्याकुळता शेवटी शिगेला पोहचते तेव्हां कवी म्हणतात,

"घे जन्म तू फिरुनी येईन मी ही पोटी
खोटी ठरो न देवा ही एक आस मोठी"
तिच्याचपोटी जन्म घेण्याची लागलेली अनिवार
ओढ यात आईपणाचा विजय समावलेला आहे

**मुलाच्या प्रेमाने वेडी झालेली आई :**

मातृवियोगाने दुःखी होऊन तळमळणारा मुलगा तर दुसरीकडे आईला मुलाच्या मृत्युने झालेला शोक व्यक्त करणारी गोविंदाग्रजांची कविता 'राजहंस माझा निजला' तरुण विधवेचे बाळ मृत झाले आहे. आपले बाळ मृत झाले ही ती कल्पनाच करु शकत नाही. ते मांडीवर झोपले आहे असे आई सांगते. त्यामुळे सर्वांना ती शांत बसण्यास सांगते आहे. कवी म्हणतात,

" दुर्देवनगाच्या शिखरी नवविधवा दुःखी आई
हे हृदय कसे आईचे मी उगाच सांगत नाही
जे आनंदेही रडते दुःखात कसे ते होई

हे कुणी कुणा सांगावे
आईच्या बाळा ठावे
प्रेमाच्या गावा जावे
मग ऐकावे या बोला
राजहंस माझा निजला"

अंत्यसंस्कारासाठी जमलेल्या लोकांचा ती निषेध करते आणि बाळाला पाहते त्याचा मुका घेते आणि म्हणते

जा, करा आपुले काळे
माझेही दमले डोळे
प्राणांचे पसरुनि जाळे
मी निजते घेऊनि याला | 'राजहंस माझा निजला'

ही कविता मनाला चटका लावून जाणारी आहे. मुलासोबत आई ही मरते मुलाचे दु:ख ती पाहु शकत नाही आईची माया वेडी असते याचा प्रत्यय आपल्याला याठिकाणी येतो. आईचे मन शेवटपर्यंत मुलगा मेल्याचे कबूल होत नाही.

फ.मु. शिंदे इंदिरा संत, कवी अनिल वि.म. कुलकर्णी, ग्रेस, श्रीरंग जोशी, इ. कवींनी काव्य लिहून आपल्या आईविषयक भावना व्यक्त केल्या आहेत. कवी ग्रेस आपल्या 'आई' या कवितेतून म्हणतात,

"ती गेली तेव्हां रिमझिम पाऊस निनादत होता
मेघात अडकली किरणे तो सुर्य सोडवित होता
अंगणात गमले मजला संपले बालपण माझे"

**एकरुपत्वाच्या प्रत्ययातुन आईविषयक प्रेम भावना :**

केशवसुतांच्या समकालीन असणाऱ्या ग्रामीण कवयित्री म्हणजे बहिणाबाई चौधरी पण त्यांचे काव्य त्यांच्या मृत्युनंतर प्रकाशित झाले. बहिणाबाई अशिक्षित पण आईविषयीच्या आपल्या भावना त्यांनी फारच कमी शब्दात व्यक्त केल्या त्या म्हणतात,

"माय म्हणता म्हणता
ओठ ओठाला भिडे
आत्या म्हणता म्हणता
केवढं अंतर पडे"

यावरुन असे प्रत्ययास येते की, अशिक्षित असणाऱ्या बहिणाबाईजवळ भाषाशास्त्रातील स्वनिर्मितीचे ज्ञान होते व त्यांनी जे एकरुपत्व सांगितले त्याला तोड नाही.

सासरचा त्रास सहन करणारी आई :

एके दिवशी शेतात सर्व स्त्रिया आपल्याला सासुरवास कसा आहे हे सांगत होत्या तेव्हां एक गोसावी बहिणाबाईंना म्हणाला सासरी त्रास आहे तर माहेरी जा तेव्हां बहिणाबाई म्हणाल्या

"लेकीच्या माहेरासाठी माय
सासरी नांदते".

ही दूरदृष्टी बहिणाबाईंजवळ होती. सासरचा त्रास आई मुलींसाठी सहन करते ती आई असते हे दाखवून दिले.

**विश्वात्मक आई :**

त्यानंतर साम्यवादी जाणिवेचे कवी म्हणजे नारायण सुर्वे एका कचरा कुंडीजवळ सापडलेले पोर गिरणी कामगाराने व त्यांच्या पत्नीने त्यांच्या बाळगले.

कवी लहानाचे मोठे झाले ते गिरणी कामगाराच्या घरात त्यांची ही आई दिवसभर कष्ट करी. सकाळीच कामावर जाई मुलांना भांडू नका असे सांगून चालत चालत मागे पाही. दसऱ्याच्या वेळेला ती पाचही जणांना दसरा पाहायला घेवून जात असे. दसऱ्यात भिंगऱ्या, पेपेटे, फुगे, पतंग, घेवून देत असे अशी ही आई साम्यवादी विचारांची सर्वांवर सारखंच प्रेम करत असेच एके दिवशी तिला बैलगाडीतून आणल्या जाते. तिच्या तोंडातून रक्त वाहत असते डोळे तिचे उघडे असतात. अशा वेळेला कवीला आई गेल्याचे कळते ते सदगतीत होतात त्या रात्री त्यांना झोप येणे कठीण होते म्हणून कवी म्हणतात-

"त्या रात्री आम्ही पाचांनी
एकमेकास बिलगूनी
आईची मायाच समजून
घेतली चादर ओढून
आधीच नव्हते काही
आता आई देखील नाही
अश्रूंना घालीत अडसर
जागेत होतो रात्रभर
झालो पुरते कलंदर

विश्वात्मक विचार कृतीतून आणणारी ही आई या आईपुढे आपण नतमस्तक होतो घरी चार मुले असतांना एका कचराकुंडीजवळ सापडलेल्या मुलाला जवळ करणे हा विश्वात्मक विचार गरीब असणाऱ्या आईत पहावयास मिळतो. ही मनाची दाखविलेली श्रीमंती मनाचे औदार्य हा विचार फार मोठा आहे. प्रेरणादायी आहे.

**अंधश्रध्दा नाकारणारी आई :**

भुजंग मेश्राम यांचा 'उलगुलान' काव्यसंग्रह या काव्यसंग्रहातील कवितेत आश्रम शाळेतील कातकरी समाजातील मुलांना शाळेत गणपती भेट दिला जातो. आपल्याला जणू सुवर्णपदकच मिळाले या अर्विभावात लहाण्या शिंगाड्या घरी घेवून येतो. आईला मूर्ती दाखविल्यानंतर आई गणपतीची मूर्ती स्वीकारण्यास नकार देते. देवधर्म करुनी दारिद्रयमय जीवन कंठावे लागल्याने ती विज्ञानवादी आई मुलाला म्हणते

"आदीच झोपडीत हायीत धा-बारा
त्यात ह्यो नवा कुठून आणला
जसी तारपा न काजत यावी गुरुपनव
लक्ष्मी गवरी वज्रसरी
परतेकीसाठी घियाव लागतो वर्साला कर्ज
तरीपन मिळत नाय सोर्ग
आन सुरत नाई बिगारी
गुरुजीला म्हणावा बाबा
काळजात बसलं असी गोष्ट दे एकुंदी
देव ठिवाया आता कुठीच जागा न्हाई"

हृदयात जपून ठेवावीशी वाटणारी अंतःकरणाला पटणारी एखादी कृती तिला अपेक्षित आहे. ही मागणी एका उपेक्षित समाजातील मातेची आहे. तळागाळातील आई आता जागृत होत आहे. विज्ञानवादी होते आहे. अंधश्रध्दा नाकारत आहे व तशी शिकवण ती आपल्या मुलाला देत आहे. वास्तव्याचे भान आणून देणारी ही आई आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी ठरते.

**अद्वैताच्या भावनेतुन साकारल्या गेलेली आई :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून अनुसूचित जाती (दलित) जाणिवांच्या कक्षा विस्तारल्या गेल्या त्यातून वामन, निंबाळकर, दया पवार, नामदेव ढसाळ, अरुणकुमार इंगळे, भगवान भोईर, ज्योती लांजेवार यांनी आईविषयक भावना आपल्या काव्यातून अभिव्यक्त केला. वामन निंबाळकर 'माय' या कवितेत म्हणतात

"काळी काळी कृश देही ती माझी माय असे
वण वण सकाळपासून मोळीसाठी रानात जाय
वाट पहात असू कधी तिची सारे आम्ही भाऊ
मोळी विकत नसे तेव्हां भुकलेले झोपी जावू"

उदरनिर्वाहासाठी कष्ट घेवूनही मानवाच्या साध्या गरजांची पूर्तता होत नाही याबद्दलचे दु:ख कवीने व्यक्त केले आहे. अशा वेळेला दु:खी झालेल्या मनाने कवी म्हणतात-

'शोधते माझी नजर माय
आता मी उदास होतो
दिसता कृश मोळीवाली
मोळी तिची विकत घेतो

आपल्या आई प्रमाणेच इतरांची आई आहे हा दृष्टीने व्यापक वाटतो. सगळ्या मोळीवाल्या स्त्रियांमध्ये आईची प्रतिमा पाहणे हा विचार वैश्विक उंची गाठतो.

### जाती व्यवस्थेचे दु:ख चित्रण करणारी आई विषयक कविता :

समाजात असणारी जातीव्यवस्था यामुळे समाजाचे अर्धे अंग कायम सर्वांगीण अविकसीत राहिले. जातीव्यवस्थेमुळे स्त्रीचे दुहेरी शोषण झाले. एक स्त्रीमुळे व दुसरे जातीमुळे झाले. जननी जन्मभूमी या कवितेत ज्योती लांजेवार म्हणतात आई मला तुझा पदर लक्तरलेला दिसतो तो मला राष्ट्रध्वजाइतकाच प्रिय वाटतो व तुझ्या कपाळावरचे जे कुंकू आहे त्यात मला अशोकचक्राचा भास होतो. अशी ही आई, जातीव्यवस्थेमुळे उच्चवर्णीय स्त्रीसारखी दिसत नसल्याचे त्या नमूद करतात व म्हणतात,

"आई तु दिसली नाहीस कधी
नव्या कोऱ्या जरीकाठी इरकली लुगड्यात
पुतळ्यांची माळ गळ्यात
गोठ पाटल्या हातात
रबराच्या वाहनाही पाहिल्या नाहीत
मी पाहिलं तुला
रोजगार हमी योजनेत राबराब राबतांना
तू तरी शिकून आंबेडकरावानी हो जो बापा
माया हाताचं टोपलं सुटू दे जो म्हणतांना
............ मी पाहिलं तुला
कागदं काचा वेचून वेचून जमवलेला पैसा
दिक्षाभूमीला दान देतांना
एकोप्याने जगा रे बाबांचे स्मारक करा रे"

............ असे सर्व सांगून ही आई शेवटच्या घटका मोजतांना 'जयभीम' म्हणते जातीव्यवस्थेच्या दु:खाने होरपळणारी आई, शिक्षणासाठी प्रेरित करणारी, आंबेडकरांच्या विचारांचा वारसा चालविणारी आई. मरतांना आंबेडकराबद्दल 'जय भीम' म्हणून त्यांच्या बद्दलची कृतज्ञता बाळगतांना प्रत्ययास येते.

शाहु, फुले व बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने स्त्री शिकू लागली पण समाजातील वास्तव ती नाकारु शकत नाही. समाजात जगतांना स्त्रियांना असुरक्षिततत वाटते कारण पुरुषांची विषारी लालसा म्हणून मुलगी आईला म्हणते,

बुरखा वापरावा काय? या विचारा पर्यंत येते तेव्हां आई म्हणते

स्वत:च्या बुध्दीवर असू दे
दूर्दम्य विश्वास
आणि लचकणाऱ्या कॅटवॉकपेक्षा
दमदार पावलं टाक
चार दागिण्यांच्या सेट पेक्षा
मौलिक विचारांची जपणुक कर
समोरच्या नजरांनाही मग कापरं भरेल

अशी ही उर्मिला चाकुरांच्या कवितेतील आई आत्मतेजाचं स्फुलिंग जागे करायला सांगते.

**आधुनिक विचारांची आई:**

आजचा काळ हा जागतिकीकरणाचा काळ आहे. या जागतिकीकरणाच्या काळात माणसाने खूप मोठ्या प्रमाणात तांत्रिक प्रगती केली आहे पण समाजात आजही स्त्री पुरुष विषमता पहायला मिळते आहे. त्यामुळे पुरुषवर्चस्व प्रधान संस्कृतीला बळी पडून ती सोनोग्राफीच्या मदतीने मुलीचा गर्भ टाकून देत आहे. शिक्षणाच्या अभावाने आजही ती पतीच्या / सासऱ्याच्या त्रासाला कंटाळून ती तिच्या चिमुकलीसह आत्महत्या करीत आहे. स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा त्या आर्थिक दृष्टया संपन्न व्हाव्यात नाही तर स्त्रियांच संपुष्टात येतील. म्हणून ह्या आजच्या मातांना विनंती आहे की आपल्या मुलीच्या लग्नात हुंडा देवू नका तिचे मनगट बळकट बनवा तिची बोळवण करतांना साडी चोळी बरोबर घट्ट मन, आत्मविश्वास, कणखरपणा, बाणेदारपणा द्या. कारण तसेच सुंदर हत्यार आहे असे सांगतांना दिसते.

**स्त्री-पुरुष समानता व्यक्त करणारी आई :**

स्त्री लिंगाची परवड होवू नये म्हणून एक आई दुसऱ्या आईला सांगत आहे. स्वाती पवार आपल्या कवितेत म्हणतात

"गर्भच असा वाढव आई
जणु तो तुझा स्वर्ग आहे
स्त्री पुरुष समानतेचा
तोच एक मार्ग आहे"

आजच्या आईला स्वत:ही कणखर बनायचे आहे आणि मुलीलाही कणखर, बाणेदार बनवायचं आहे याचा प्रत्यय आपल्याला प्रतिमा इंगोले यांच्या कवितेतून येतो त्या म्हणतात-

"जावई बुवा ! जास्त
बोलाचं कामं नाय
पोसीन लेक मायी
धाळत तिले नायी
मारता झोळता अन् डागता माया पोरीले
आणून घालता इथी, धाक घालता तिथे
बस झाला जुलुम होत नायी सईन
पोटी सपादली तशी आता ताटी सपादीन
दोन कस्ट करीन आन् सुखान खाईन
आखरीचचं सांगतो
खुशाल पलटून जा
राहीन इथिसां जसा चवथ लेक आमचा

जावयाचा, सासऱ्याचा धिक्कार करु लेकीला माहेरी आश्रय देण्याची हिंमत या आईने बोलून दाखविली आहे की क्रांतीकारी आई मनाला उभारी आणते, आईच्या या वक्तव्यात स्त्री पुरुषांच्या या नात्याने नवे वळण घेतले आहे. प्रतिमा इंगोले आपल्या मुलीला सासरी होणारा त्रास सहन न करता बाणेदार व्यक्तिमत्व घडविण्यासाठी कटिबध्द आहे. पैंजण या कवितेमध्ये ती मुलीला म्हणते

"पैंजणाची शपथ तुले
नाव मायचं राखजो
सोसण्याचा माया वसा
तु तरी लेकी तोडजो"

असे सांगतांना दिसते.

वेदकाळापासून ते आतापर्यंत जे काही लेखन झालेले आहे ते त्या त्या कालखंडानुसार व त्या त्या प्रदेशानुसार जातीनिहाय बोलीभाषेत झालेले आहे. ती भाषा, बोली ही प्रत्येकाची मातृबोली. आई ही कोणाचीही असु द्या, कोणत्याही जाती-धर्माची, पंथाची असु द्या ती श्रेष्ठच असते. तसेच मातृबोली ही कोणाचीही असु द्या, कोणतीही असु द्या ती श्रेष्ठ होती व आजही आहे.

अशा प्रकारे आईचे विविध्यपूर्ण रुपे वेदकाळापासून तर जागतिकीकरणाच्या काळापर्यंत पाहिलेत. आई म्हणून समाजात ती पूजनीय ठरली आहे पण स्त्री म्हणून आज ही तिच्या वाट्याला दु:ख येत आहे. त्यासाठी पुरुषांनी स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी लक्ष देवून माणूस म्हणून तिचा स्विकार करावा. आईचे पूजनीय स्थान डळमळीत होवू नये यासाठी आजच्या आईने पुरुषांच्या वासनाधीनतेला शरण न जाता धैर्याने नैतिकतेने आपली वाट चोखाळली पाहिजे.

आज देशाला गरज आहे दीपा, ललिता, साक्षी व सिंधू सारख्या मुलींची. मुलींवर चांगले संस्कार झाले पाहिजे जेणे करुन राष्ट्राचे कार्य त्या करु शकतील. वा राष्ट्राचा या भूमातेचा सन्मान होईल तिचे पांग फेडल्या जातील. सुरेश भटच्या ह्या ओळी

"गे माय भू तुझे मी
फेडीन पांग सारे
आणिन आरतीला हे सूर्य चंद्र तारे
आई तुझ्या पुढे मी
आहे अजून तान्हा
शब्दात सोड माझ्या आता हळूच पान्हा
आई तुझी अशी गाईन रोज गाणी
माझी तुझ्या दुधाने गेली भिजून वाणी
मी पायधूळ घेतो जेव्हां तुझी जराशी
तुझी ललाट रेषा बनते प्रयाग काशी"

अशा या आईचं प्रेम आपण हृदयात साठवूया. आपण ही प्रयत्न करु विश्वात्मक आई होण्यासाठी विश्वात्मक आई झालेल्या मदर तेरेसा, सिंधूताई सपकाळ यांच्या विचारांना, कृतींना प्रणाम.

लाभले भाग्य आम्हास
बोलतो मराठी
जाहलो धन्य आम्ही
ऐकतो मराठी
धर्म,पंथ, जात एक मानत मराठी
अवघ्या जगात माय मानता मराठी

**निष्कर्ष :**

१. वेदकाळापासून ते आतापर्यंत आईची वैशिष्ट्यपूर्ण रुपे प्रत्ययास येतात.
२. वेदकाळात आईचा गुणगौरव तिच्या मनातील भक्तीभाव व पुत्रासाठी सैरभैर झालेली आई पहावयास मिळते.
३. संत काव्यात आई व विठ्ठल यांच्या एकरुपत्वाचा अद्वैताचा प्रत्यय येतो.
४. लोकसाहित्यात नि:स्वार्थी प्रेम करणारी आई व आईबद्दल ची कृतज्ञता विविध रुपांच्या माध्यमातून अभिष्यक करण्यात आलेली दिसून येते.
५. केशवसुतांच्या प्रेरणेतून तयार झालेल्या रवीकिरण मंडळातील कवींच्या कवीतेत मातृवियोगाचे दु:ख व व्याकुळता प्रत्ययास येते.
६. ग्रामीण कवितेतून दूरदृष्टी असणारी आई क्रांतीकारी आई, स्त्री-पुरूष समान मानणारी आई दिसून येते.
७. साम्यवादी जाणिवेचे कवी नारायण सुर्वे यांच्या कवितेतून विश्वात्मक विचारधारेची आई प्रत्ययास येते.

८. आदिवासी कवितेतून अंधश्रध्दा नाकारणारी विज्ञानवादी आई प्रतिबिंबीत होतांना दिसते.
९. जातीव्यवस्थेच्या दु:खाने होरपळलेली गरीब आई प्रत्ययास येते. त्याचबरोबर बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित झालेली बाबासाहेबांबद्दल कृतज्ञता आदर व्यक्त करणारी आई आपल्याला दिसते.
१०. स्त्रीवादी कवितेतून क्रांतीकारी विचारांची व स्त्री-पुरुष समानतेचा आदर्श सांगणारी आई अभिव्यक्त झालेली दिसते.
११. बोलीला मातृत्व बहाल केल्याचे कवितेत प्रत्ययास येते.
१२. आई व बोली ही कोणत्याही जाती धर्माची असू द्या ती श्रेष्ठ असते व आहे. श्रेष्ठ कनिष्ठत्वाचा भेद तिच्यात नसतो.
१३. आई म्हणून समाजात स्त्रीचा गौरव झाला पण स्त्री म्हणून झाला नाही ही स्त्री जीवनाची शोकांतिका आहे. हे खेदाने नमूद करावेसे वाटते.

**संदर्भग्रंथ :**


१. चंदनशिवे सुनिल, मराठी दलित कविता एक चिकित्सक अभ्यास
२. जाधव जयद्रथ, देशमुख भरत, मराठी साहित्य स्वरुप आणि समीक्षा
३. गायकवाड गं.ह., मराठी कवितेतील आई
४. सरकटे सदाशिव, १९८० नंतरची स्त्रीवादी कविता
५. पाटील प्रसन्नकुमार, स्त्रीवादी कविता.
६. पानसे श्रुती - स्त्रियांच्या ओवीगीतातील प्रतिमा सृष्टी
७. भवाळकर तारा- लोकपरंपरा आणि स्त्री प्रतिभा.